
# आंबेडकरवाद आणि नामदेव ढसाळ ह्यांची कविता





संपादक
डॉ.किशोर झिलपे
डॉ.अशोक भक्ते

मराठी विभाग
नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड
ता.नरखेड, जि.नागपूर

M.G. Arts, Science & late N.P. Commerce College ★Armori★

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत

एक दिवसीय

राष्ट्रीय चर्चासत्र

# आंबेडकरवाद आणि नामदेव ढसाळ ह्यांची कविता

२० सप्टेंबर २०१६

शोधनिबंध पुस्तिका

* संपादक *

डॉ.किशोर झिलपे

डॉ.अशोक भक्ते

* आयोजक *

मराठी विभाग

नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड

ता.नरखेड, जि.नागपूर



प्रकाशक *
प्राचार्य
नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड
दुरध्वनी : ०७१०५-२३६२७४
ई-मेल : npsmm@rediffmail.com

प्रथम आवृती : २० सप्टेंबर २०१६

ISBN : 978-93-5235-973-8

© संपादकीय

मुद्रक *
शिवम् प्रिंटर्स
[illegible] मंदीर जवळ, काटोल

किंमत = ४५०/-

[illegible] शोधनिबंधातील मतेही प्रत्येक निबंधकाराची वैयक्तिक मते [illegible] मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# अनुक्रमणिका


१ नामदेव ढसाळ ह्यांची कविता
डॉ.अक्षयकुमार काळे १

२. नामदेव ढसाळ यांची काव्यशैली
डॉ. प्रमोद मुनघाटे ५

३. नामदेव ढसाळ यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व
- डॉ. इंद्रजित ओरके ११

४. नामदेव ढसाळांच्या कवितेतील जीवनसंघर्ष
प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे १९

५. नामदेव ढसाळांच्या कवितेतील आंबेडकर दर्शन
प्रा.डॉ.विलास तायडे २४

६. नामदेव ढसाळांच्या काव्यातील सामाजिक जाणिवा
डॉ.किशोर र.झिलपे २८

७. नामदेव ढसाळांच्या कवितेवरील पाश्चिमात्य साहित्यिकांचा प्रभाव
डॉ. पवन मांडवकर ३२

८. नामदेव ढसाळांच्या कवितेतील महानगरीय जाणीव
प्रा. विनोद राऊत ४१

९. नामदेव ढसाळ आणि विद्रोह
डॉ. भास्कर पाटील ४६

१०. शब्दप्रभू नामदेव ढसाळ यांची काव्यशैली
डॉ. विनोद ज़ीवनतारे ५३

११. कवी नामदेव ढसाळांचे काव्यविश्व
प्रा.डॉ. राजेंद्र वाटाणे ५८

१२. नामदेव ढसाळांच्या कवितेतील विद्रोहाचे स्वरुप
डॉ. प्रियदर्शनी व. देशमुख ६२

१३. नामदेव ढसाळांची दीर्घ कविता
डॉ. भूषण रामटेके ६५

१४. 'गोलपिठा' मधील अनुभव विश्व
डॉ. जनार्दन काटकर ६९

१५. नामदेव ढसाळांच्या कवितेतील विद्रोह
प्रा.डॉ. अविनाश श. धोबे ७६

१६. नामदेव ढसाळांच्या कवितेतील महानगरीय जाणीव
प्रा.संतोष बाळकृष्ण डफळापूरकर ७९

१७. नामदेव ढसाळांच्या कवितेतील आत्माविष्कार आणि सामाजिक जीवन जाणिवा८२
डॉ. गजानन गोपाळराव हेरोळे

१८. नामदेव ढसाळांच्या कवितेतील विद्रोहाचे स्वरुप
प्रा. अनूप अरूण नांदगावकर ८५

१९. नामदेव ढसाळांची काव्यशैली
डॉ. अशोक ग. इंगळे ८९

२०. नामदेव ढसाळांची कविता : वेदना आणि उद्रेक
डॉ. मनीषा नागपुरे ९५

२१. गोलपिठाकार नामदेव ढसाळ आणि आंबेडकरी विचार
डॉ. सी. डी. पाखरे ९९

२२. गोलपिठातील सामाजिकता
प्रा. डॉ. विजय रैवतकर १०३

२३. बाबासाहेबांचे विचारमंथन उरी भरणारा काव्यसंग्रह : तुझे बोट धरून चाललो आहे मी
डॉ. अनंता सूर १०७

२४. गोलपीठातील अनुभवविश्व
डॉ.प्रेमा चोपडे—लेकुरवाळे १११

२५. नामदेव ढसाळांच्या कवितेतील आशय आणि विद्रोह
डॉ. प्रवीण ब. काळे ११५

२६. आंबेडकरवाद आणि नामदेव ढसाळ यांची कविता
प्रा. डॉ. अरविंद युगंधर ११८

२७. नामदेव ढसाळ आणि गोलपिठा
प्रा. प्रवीण घारपुरे १२२

२८. नामदेव ढसाळांच्या कवितेतील आत्माविष्कार आणि सामाजिक जीवन जाणिवा१२५
डॉ. सुवर्णा रा. गाडगे

२९. नामदेव ढसाळांच्या कवितेतील मानवतावाद
प्रा. गोपीचंद कठाणे १३०

३०. साठोत्तरी मराठी कवितेत नामदेव ढसाळांचे स्थान
प्रा.सुधाकर भुयार १३३

३१. नामदेव ढसाळ यांची कविता : गोलपिठा
डॉ.पी.आर.पुंडकर १३७



Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# गोलपिठातील सामाजिकता

प्रा. डॉ. विजय रैवतकर
सहायक प्राध्यापक
महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी

'रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यानो...' रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांना हाकारत अंधारयात्रिक ...याचे ठामपणे नाकारणाराबंडखोर कवी म्हणजे नामदेव ढसाळ. जागतिक साहित्यविश्वावर आपली ...ल्लीदार मोहोर उठविणारा कवी म्हणजे नामदेव ढसाळ. मुंबईतील वेश्यावस्तीतील वकालपण, ...कारलेपण आणि उध्वस्तपणाचा उद्रेक घेऊन नामदेव ढसाळांचा गोलपिठा हा धगधगीत काव्यसंग्रह ...राठी साहित्यात अवतरला आणि त्याने मराठी साहित्यविश्वाला धक्का दिला. मराठी काव्याचे ...ापदंड वदलून टाकले. प्रस्थापित साहित्यप्रांतात दलित आणि शोषित वर्गाची जळजळीत, बंडखोर भाषा नव्याने दाखल झाली. गोलपिठानंतर नामदेव ढसाळ यांचे 'मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले', 'आंबेडकरी चळवळ', 'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता', 'खेळ', 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र: प्रियदर्शिनी', 'या सत्तेत जीव रमत नाही', 'गांडू बगीचा', 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे', 'तुझे बोट धरून मी चाललो आहे' आदी काव्यसंग्रह प्रकाशित झाले. यातून नामदेव ढसाळ यांची प्रतिभा जगाला परिचित झाली. त्यांच्या असामान्य प्रतिभेचे दर्शन साहित्यरसिकांना झाले.

नामदेव ढसाळ यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून व्यवस्थेविरुद्ध बंड केले. कविता लिहित असतानाच्या काळात 'कविता हे राजकारण आहे' असे म्हणत त्यांनी अमेरिकेतील ब्लॅक पॅंथरच्या ध...र्तीवर दलित पॅंथर ही क्रांतीकारी संघटना स्थापन केली. दलितांवरच्या वाढत्या अत्याचाराचा मुकाबला करण्यासाठी दलित चळवळ प्रभावी ठरत नाही त्यासाठी क्रांतीकारी चळवळ उभारण्याच्या दृष्टीने ढसाळांनी उचलेले हे पाऊल होते. ही तरुणांची चळवळ होती. जिथे जिथे दलितांवर अत्याचार होत होता तिथे तिथे ही संघटना संघर्षासाठी धावून जात होती. रस्त्यावर उतरून संघर्ष करणे, अत्याचाराला विरोध करणे हे दलित पॅंथरचे वैशिष्ट्य होते. १९७०–८० च्या दशकात महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजिक जीवनात खळबळ माजवून देणाऱ्या दलित पॅंथरने आपला दबदबा निर्माण केला होता. यातूनच ढसाळाची चळवळी वृत्ती निर्माण होत गेली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील चळवळी वृत्ती आणि अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची संघर्षशीलता स्वाभाविकच त्यांच्या प्रतिभेचा विषय झाली. गोलपिठा या काव्यसंग्रहातील कवितांतून प्रकटणाऱ्या सामाजिक जाणिवा व समाजविघातक प्रवृत्ती विरुद्ध केलेला विद्रोह, त्याचेच फलित होय.

गोलपिठा काव्यसंग्रहातील 'उघडझाप चालू हे', 'घर सोडताना', 'बेंबीचा देठ ओला होणाऱ्या वयात', 'रस्त्याच्या कडेकडेने', 'वेश्येच्या धंदेवाईक प्रेरणांतून', 'त्यांची सनातन दया', 'रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो', 'आमच्या आळीतून जाताना', 'आत्ता', 'रांडकी पुनव' ईत्यादी कितीतरी कवितांतून मुंबईतील गोलपिठा वस्तीतील वेश्यांच्या आयुष्यातील वकालपणाचे जिवंत वास्तव ढसाळांच्या काव्यातून प्रकट झाले आहे. शिवाय समाजातील विषमता, जातीयता, त्यातील दुःख, सामाजिक विकृती याविषयीच्या संवेदनशील जाणिवा त्यांच्या कवितेतून व्यक्त होतात तसेच विषम समाजव्यवस्थेविरुद्ध कवी बंड करून उठताना दिसतो.

Principal
Mahatma Gandhi Arts
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

दलित काव्यवाङ्मयाच्या परंपरेत अंतर्बाह्य भाषा, रूप, रचना, घाट आणि आशयानेही निराळी नाही तर प्रवृत्ती व प्रकृतिधर्मानेही अधिकच स्फोटक अशी गोलपिठातील नामदेव ढसाळांची कविता आहे. तिने एकूणच पांढरपेशा काव्याभिरुचीला फार मोठा हादरा दिला. ग्रंथप्रामाण्यवादी सनातनी प्रवृत्ती विरुद्ध त्यांची कविता पेटून उठली, विद्रोह पुकारला,

'बेंबीचा देठ ओला होणाऱ्या वयात
तुझ्या कुकर्माची महाकाव्ये बलात्कार करून...
पाखंडी मनूला– माणसाच्या शत्रूला
तू डोक्यावर घेतलेस...
मी तुला शिव्या देतो, तुझ्या ग्रंथाला शिव्या देतो, तुझ्या संस्कृतीला शिव्या देतो
मी सारं काही बोलणार नव्हतो पण माझे हात जागे झालेत
हजारो वर्षे मी होतो खंगत
या गुहागुहातल्या प्रचंड अंधारात
कालच तो गुहेच्या तोंडाशी ठेवून गेला पिसाळलेला जाळ
मी शिलगावीत जाणार आहे यापुढचा काळ' (गोलपिठा, पृ. १०, ११)

अशा कितीतरी कवितांतून ढसाळांनी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध वंड पुकारून विद्रोह केला आहे. त्यांच्या विद्रोही व्यक्तिमत्त्वाचा हा प्रातिभ आविष्कार होय. अंतर्मनातील धग, सल त्यांच्या काव्यातून व्यक्त होते. ती संयमी सामाजिक जाणिवेतून आविष्कृत न होता संघर्षशील भावविश्व प्रकट करते. समाजमन चेतविण्याचे कार्य करते.

नामदेव ढसाळ त्यांच्या कवितेतून मानवविघातक प्रवृत्तीविरुद्ध लढा देण्यासाठी आवाहन करताना म्हणतात,

'किती दिवस सोसायची ही घोर नाकेबंदी
मरेपर्यंत राह्यचे का असेच युद्धकैदी?
ती पहा रे ती पहा, मातीची अस्मिता आभाळभर झालीय
माझ्याही आत्म्याने जिंदावादची गर्जना केलीय
रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो
आता शहराशहराला आग लावीत चला' (गोलपिठा पृ. १३)

समाजव्यवस्थेतील जातीयतेचे चटके सहन करणाऱ्या दलित समाजाच्या व्यथा, त्यांची पिळवणूक, त्यांच्यावरील अत्याचार याविरुद्ध क्रांती करायला लावणारी व शोषणाविरुद्ध पेटून उठण्यासाठी आवाहन करणारी नामदेव ढसाळ यांची कविता आहे.

प्रतिगामी वृत्तीच्या लोकांनी पारंपरिक धर्मशास्त्र व वेदादिकांतील कल्पनांना प्रमाण मानून समाजातील वर्णव्यवस्थेचा नेहमीचा पुरस्कार केला. त्यांनी माणसामाणसांमध्ये भेद करून सामाजिक स्तर निर्माण केले व खालच्या स्तरांत गणल्या गेलेल्या माणसांना माणूस न मानता केवळ गुलाम म्हणून, शुद्र म्हणून अमानुष अत्याचार करीत राहिले. समाजजीवनात अशी व्यवस्था निर्माण करणाऱ्या पांढरपेशी प्रवृत्तीच्या लोकांना नामदेव ढसाळांची कविता प्रश्न करते,



'हे वाघा! तू माणसालाच असे हीन केलेस
तुला वेशीबाहेरचा आक्रोश ऐकू आला नाही का?
पेटलेला माणूस दिसला नाही का?
उदासीनतेचा विराटपणा तुला स्पर्शला नाही का?
विजेचा लोळ वेशीची तटबंदी फोडून आत येतोय रे
सांग का देत नाहीस त्याला कडकडून मायेचे आलिंगन?
का तोडून टाकत नाहीस शतकानुशतकाचे काटेरी कुंपन? (गोपपिठा पृ. १०)

ढसाळांची कविता अशा प्रश्नांतून पांढरपेशी समाजव्यवस्थेला सामाजिक विषमतेविषयी जाब विचारते. कवीने त्यांच्या कवितेतून विचारलेले प्रश्न अतिशय सयंत भाषेतील असले तरी ते पुढे शांत बसताना दिसत नाही. वेशीबाहेर राहून मुकपणे अन्याय गिळंकृत करणाऱ्यांना बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षशील व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देऊन समाजात समता आणि बंधुता नांदावी यासाठी दलितांना चेतविण्याचे कार्य त्यांची कविता करते. ते म्हणतात,

'सूर्याकडे पाठ फिरवून ज्यांनी शतकांचा प्रवास केला
आत्ता अंधारयात्रिक होण्याचे नाकारले पाहिजे...
सूर्यफुले हाती ठेवणारा फकिर हजारो वर्षानंतर लाभला
आत्ता सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे' (गोलपिठा पृ. १२)

ते सूर्योन्मुख होण्याचा आवाहन करतात अर्थात बाबासाहेबांच्या शिकवणुकीनुसार वागले पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. बाबासाहेबांच्या शिकवणुकीचा मूलमंत्र देऊन बाबासाहेबांनी अखिल मानवजातीच्या कल्यानासाठी मानवतावादाचा पुरस्कार केला अगदी त्याच तत्त्वावर नामदेव ढसाळाची कविता मानवी जीवनाचे व्यापक विश्वमूल्ये प्रकट करते. 'माण्साने' या कवितेत ते म्हणतात,

'माण्साने पहिल्याप्रथम स्वतःला
पूर्ण अंशाने उद्ध्वस्त करून घ्यावे...
नंतर उरल्यासुरल्यांनी कुणालाही गुलाम करून नये लुटू नये
काळागोरा म्हणू नये तू ब्राह्मण तू क्षत्रिय तू वैश्य तू शूद्र असे हिणवू नये...
आभाळाला आजोबा अन् जमिनीला आजी मानून त्यांच्या कुशीत
गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा माण्सावरच सूक्त रचावे
माण्साचेच गाणे गावे माण्साने' (गोलपिठा पृ. ३२)

सामाजाचे दलित, दलितेतर विघटन त्यांना मान्य नाही. आर्थिक, सामाजिक विषमतेने पोखरलेली समाजव्यवस्था ते नाकारतात. समाजात विश्वबंधुत्वाची भावना रुजून समता नांदावी, विविध जातिधर्म विरहित समाज निर्माण होऊन मानवता हाच धर्म प्रस्थापित व्हावा, अशी अपेक्षा ढसाळ त्यांच्या कवितेतून करतात.

ढसाळांच्या कवितेने माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवू पाहणाऱ्या समाजाच्या मनात धुमसत राहिलेला अंगार व्यक्त केला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विद्रोहीवृत्तीचा त्यांच्या निर्मितीवर प्रभाव पडलेला आहे. त्यांनी पारंपरिक काव्यरचनेच्या संकेतांना डावलून लढाऊ वृत्तीच्या, संघर्षाला

प्रेरक अशा बेजोड, स्फोटक आणि सर्जनात्मक अशा शब्दप्रतिमांचा वापर केला आहे. जिवं[illegible] आणि वास्तवदर्शी अनुभूतीला प्रकट करण्यासाठी पोषक अशा या शब्दप्रतिमा आहेत असें म्हणावे लागेल. जीवनवास्तवातील वैविध्यपूर्ण प्रत्ययकारी आविष्करण, नकार, विद्रोह, चिड आणि दुःखप्रक्षोभ इत्यादी भावनांनी ओतप्रोत भरलेल्या गोलपिठातील सामाजिक आशयाच्या कविता भावनोत्कट व काव्यमय सौदर्यजाणिवांचा सर्जनशील आविष्कार होय. कवितेसाठी कविता करण्यापेक्षा कविता ही जगण्याची अपरिहार्यता हे त्यांच्या जीवनानुभूतीनेच निर्माण केले आहे. जीवनानुभूतीतील आत्मनिष्ठ अनुभवांना विश्वात्मक करण्याची किमया त्यांना साधता आल्याने त्यांची कविता निश्चितच प्रचारकी झाली नाही. कविता जगण्याचे कार्य ढसाळांनी केले. आयुष्यभर मानुसकेंद्री व्यवस्थेच्या प्रस्थापनेसाठी लढा देत राहिले. मानवविघातक व्यवस्थेच्या बदलासाठी लेखणीसह त्यांनी आयुष्य झिजविले. ते खऱ्या अर्थाने समाजिक कवी होते. दाहकता, कारुण्य, व्यथा, वेदना आणि त्यांनी पुकारेला बंड, विद्रोह त्यांच्या काव्याचे विशेष होय. समाजजीवनातील विलक्षण विषमता, त्यातील वेदना व सल यातून आपली प्रतिभा फुलवण्याचे कार्य ढसाळांनी केले. प्रसंगी त्यांची कविता विद्रोह करते पण त्यांच्या काव्यातील विद्रोह विश्वात्मक मूल्यजाणिवा प्रकट करण्यासाठी असल्याचे लक्षात येते. त्यांच्या काव्यातील विद्रोह वाङ्मयीन विद्रोह असून साहित्याला जीवनात्मक आणि कलात्मक उंची प्राप्त करून देणारे आहे.

नामदेव ढसाळांनी त्यांच्या गोलपिठातून वाङ्मयीन जाणिवांना समाजसापेक्ष मानवमूल्यांशी जोडण्याचे कार्य केले. त्यातून साहित्यिक परिभाषा बदलू लागली. व्यक्त होण्यासाठी साहित्य, व्यवस्था बदलासाठी साहित्य, नवे शस्त्र तयार करण्यासाठी साहित्य अशी व्याख्या काव्याची वा साहित्याची अप्रत्यक्षपणे होऊ लागली. नामदेव ढसाळ यांच्या सर्जनशील निर्मितीत याचा प्रत्यय ठिकठिकाणी होतो. ढसाळांनी गोलपिठातून दलित, शोषितआणि वेश्यांच्या जीवनातील महावेदना जिवंतपणेरेखाटल्या आहेत हे करताना त्यांनी काव्यरचनाविषयक सांकेतिक तडजोड स्वीकारली नाही. त्यांनी स्वतःच्या जगण्यातील तसेच व्यवस्थेने अप्रामाणिक ठरवलेले सारे शब्द काव्यातून आणले. 'रक्तात पेटलेल्या सूर्यांना हाकारीत' त्यांची कविता पुढे जात असताना त्यातील बंडखोरीच्या प्रत्ययाने साहित्यरसिक दीपून गेल्याशिवाय राहत नाही.


संदर्भसूची

१. नामदेव ढसाळ, 'गोलपिठा', लोकवाङ्मयगृह, मुंबई, तिसरी आवृत्ती १९९९